## श्रीगणपतीची उत्तरपूजा

(उत्तरपूजेचा काल हा ऋषिपंचमीचा दिवस, गौरीविसर्जनाचा दिवस किंवा अंतचतुर्दशीचा दिवस.)

आचम्य श्रीसिद्धिविनायकमहागणपतिप्रीत्यर्थं गंधादिपंचौपचारैः उत्तरपूजनं करिष्ये । महागणपते नमः । विलेपनार्थे चंदनं समर्पयामि । अक्षतां हरिद्रां कुंकूमं च समर्पयामि । श्रीमहागणपतये नमः । सिदूरं दूर्वांकुरन् कालोभ्दवपुष्पाणि च समर्पयामि ।।

वरील प्रमाणे मंत्र म्हणून गणपतीला गंध, फुले, अक्षता, हळदकुंकू, दुर्वा, शेंदूर हे उपचार वाहावेत. श्रीमहागणपतये नमः । धूपं समर्पयामि । श्रीमहागणपतये नमः । दीपं समर्पयामि । श्रीमहागणपतये नमः । नैवेद्यं समर्पयामि ।

वरील मंत्र म्हणून गणपतीला धूप, दीप ओवाळावा व नंतर नेवैद्य दाखवावा. कापूर लावून आरती करावी व पूजेच्या शेवटी दिलेले मंत्रपुष्पाचे व प्रार्थनेचे मंत्र म्हणावेत.

आरती, मंत्रपुष्प व प्रार्थना करून झाल्यानंतर गणपतीला दहीपोहे व तळलेले मोदक यांची शिदोरी द्यावी. (वरील गोष्टींचे गणपतीबरोबर विसर्जन करावे.) अनेक कृतउत्तराराधनेने तेन श्रीभगवान् सिद्धिविनायकः सांगः सपरिवारः प्रीयतामः । ॐ तत्सत् ।

एवढ्या वरील सर्व गोष्टी करून झाल्यानंतर घरातील सर्व मंडळींनी देवास नमस्कार करावा व नंतर दिलेला मंत्र म्हणून गणपतीवर अक्षता टाकाव्या व गणपती उतर दिशेकडे हलवावा.

यान्तु देवगणाः सर्वे पूजामादाय पार्थिवीम् ।

इष्टकामप्रसिद्ध्यर्थं पुनरागमनाय च ।।

ॐ तत्सद् ब्रह्मार्पणमस्तु ।

नंतर पार्थिव मूर्तीचे विसर्जन नदीत, अगर समुद्रात अगर तळ्यात सोयीप्रमाणे करावे.